**अतित्वर्य/महत्वाचे** **पुणे महानगरपालिका**

**आजचे आज वाटणे** **स्थायी समिती**

**तहकूब सभा परिपत्र**

स्थायी समितीची तहकूब झालेली सभा (**मंगळवार दि. १३/३/२०१८** रोजी तहकूब केलेली सभा) **गुरूवार दि.१५/३/२०१८ रोजी सकाळी ११:३० ( साडे अकरा )** वाजता महात्मा जोतिबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत **कार्यपत्रिका क्र. ५३ दि. १३/३/२०१८ वरील विषय क्र.२३०८ ते २३५० तसेच खालील दाखल विषय क्र. २३५१ त्वर्य ते २३८५ त्वर्यचा** विचार होईल.

**विषय क्र.२३५१ त्वर्य**

जिल्हा वार्षिक योजना – नाविन्यपुर्ण योजना सन २०१६–१७ अंतर्गत पुणे शहरातील विविध उद्यानात ओपन जीम साहीत्य पुरविणे व बसविणे (डी.पी.डी.सी.) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस इक्विपमेंट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७४,९२,०३०/– पेक्षा २१.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५९,१८,७०३=७० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/११४९ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५२ त्वर्य**

प्रभाग क्र. ०९ क बालेवाडी जकात नाक्यापासुन स.नं.२५,२७,२८,२९ परिसरात मुख्य जलवाहिनी व्यवस्था विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,९२३/– पेक्षा १६.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,६७,४३५=८२ पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार होणारी जादा रक्कम आदा/कमी होणारी रक्कम वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/११५० दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५३ त्वर्य**

प्रभाग क्र. २४ क रामनगर येथे विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार काकडे असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९७,५३०=५० पेक्षा ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,४७,६५३=९८ पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११५१ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५४ त्वर्य**

शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौक ते बेलबाग चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. १,५९,६६,००४/– पेक्षा ९.६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,४४,२२,०९१=४१ काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११५३ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५५ त्वर्य**

वडगाव व नव्याने ताब्यात आलेल्या जी.पी.पी. आरक्षणाच्या ठिकाणी सिमाभिंत बांधणे तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शिवप्रसाद शामराव बांदल यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,२४,३१०/– पेक्षा २९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,४१,२६०=१० रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/११५४ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५६ त्वर्य**

प्रभाग क्र.३३ अ वडगांव बु.स.नं. ५७/२, ५७/अ/२ (पार्ट) येथील ॲमिनिटी स्पेसच्या आरक्षित जागेवर बहूउद्देशिय इमारत, विविध खेळांचे इनडोअर हॉल, क्रिडादालन व क्रिडा विषयक हॉल उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शाम चंद्रकांत शिंदे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६९,५४,७२४=६८ पेक्षा २०.०२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५,६२,३८८=७९ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९२ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५७ त्वर्य**

प्रभाग क्र. २५ ब मध्ये मोठ्या व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार आकाश एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,७५९/– पेक्षा ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,९९,७९५=७० रकमेपर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११५५ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५८ त्वर्य**

प्रभाग क्र. ०९ क बालेवाडी फाटा ते लक्ष्मी माता मंदिर पर्यंत मुख्य जलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जितु विजय भालेराव यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,९४४/– पेक्षा १६.१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,५२,३५३=०६ पर्यंत अधिक भाव वाढ व विशेष भाव वाढ सुत्रानुसार होणारी जादा रक्कम आदा/कमी होणारी रक्कम वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/११५६ दि.८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३५९ त्वर्य**

प्रभाग क्र. ०९ क बालेवाडी सर्व्हिस रोड पासून स.नं. २७,२८,२९,३१,३३,३४,३८ परिसरात मुख्य जलवाहिनी व्यवस्था विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोशन एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४०,००,०००/– पेक्षा १७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,२०,०००/– पर्यंत अधिक भाव वाढ व विशेष भाव वाढ सुत्रानुसार होणारी जादा रक्कम आदा/कमी होणारी रक्कम वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/११५७ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६० त्वर्य**

प्रभाग क्र. ६ ड इंद्रप्रस्थ उद्यान येरवडा येथे विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बागल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४६,६८,०७६/– पेक्षा ४.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,५८,०१२=५८ /– पर्यंत काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/११५८ दि.८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६१ त्वर्य**

प्रभाग क्र. ३५ मधील स.नं.८५/८६, सि.स.नं. १७८२ सहकारनगर नं. २ पर्वती येथील पुणे मनपाची बालक्रिडा भवनाची मिळकत (बांधकाम क्षेत्रफळ ८१.३० चौ.मी.) श्री.योगी अरविंद सांस्कृतिक मंच या सामाजिक संस्थेस दि.१३/७/२०१७ ते १२/७/२०२२ या ५ वर्षे कालावधीसाठी देखभाल, व्यवस्थापनासाठी मिळकत वाटप नियमावली २००८ च्या तरतुदीस अधिन राहून विनामोबदला देण्यासाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परिमंडळ–३/११५९ दि.१२/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६२ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २० ड मध्ये विविध ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे कामी वॉटर टँकर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.व्हीई कमर्शियल व्हेईकल्स् लि., ठाणे या उत्पादक कंपनीकडून **PRO 5016 9KL WATER TANKER RHD BS-IV** या मॉडेलचा १ नग वॉटर टँकर खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११६० दि.१२/३/२०१८ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २० ड मध्ये विविध ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे कामी वॉटर टँकर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.व्हीई कमर्शियल व्हेईकल्स् लि., ठाणे या उत्पादक कंपनीकडून **PRO 5016 9KL WATER TANKER RHD BS-IV** या मॉडेलचा १ नग वॉटर टँकर रक्कम रु.१८,३६,२९६/- पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस.

२. पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २० ड मध्ये विविध ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे कामी वॉटर टँकर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.व्हीई कमर्शियल व्हेईकल्स् लि., ठाणे या उत्पादक कंपनीकडून **PRO 5016 9KL WATER TANKER RHD BS-IV** या मॉडेलचा १ नग वॉटर टँकर रक्कम रु.१८,३६,२९६/- पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेकामी होणारे देयक मे.व्हीई कमर्शियल व्हेईकल्स् लि., ठाणे या वाहन उत्पादक कंपनीचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस याद्वारे आदा करणेस.

**विषय क्र.२३६३ त्वर्य**

पुणे म.न.पा.हद्दीतील रस्त्याचे सेफ्टी ऑडीट करणेबाबत तज्ञ स्ल्लागाराची नेमणूक करणे (बी–२ पध्दत) कामी पुढील प्रत्येकी ५० कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक लांबीच्या टप्प्यांसाठी प्रतिवर्षी किमान २०० कि.मी. किंवा अधिक लांबीचे रस्त्यांचे अशा एकूण उर्वरित सुमारे ८०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांसाठी सेफ्टी ऑडीट करणेचे काम मे.वॉल्टर पी.मोअर इंजि.इंडिया प्रा.लि. यांचेकडून र.रुपये २४,९००/– कि.मी. अधिक आवश्यक कर (वस्तु व सेवा कर नियमाचे कलम २४३ जी चे धोरणानुसार प्युअर सर्व्हिसेस देणाऱ्या कन्सल्टंट यांना GST लागू होत नाही) याप्रमाणे एकुण १००० किमीसाठी र.रुपये २,४९,००,०००/– पर्यंत काम करुन घेणे विषयी तसेच टेंडर अटी शर्ती प्रमाणे दोन वर्ष कालावधीनंतर होणाऱ्या कामास प्रती वर्षी ५% प्रमाणे वाढीव दर देणे विषयी दुरुस्त करारनामा करणेसाठी यापुर्वीचा मा.स्थायी समिती ठराव क्र. २२३३ दि.२७/१२/२०१६ दुरुस्त ठराव करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/११६४ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६४ त्वर्य**

पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम पॅकॅज क्र. ४ अंतर्गत सुशोभिकरण व पादचारी मार्ग व्यवस्थेच्या दृष्टीने फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील गरवारे चौक ते ॲग्रीकल्चर कॉलेज चौक विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धुत इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१७,४९,४६,८५५/- पेक्षा ४.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१६,७८,९६,४९६=७४ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११६५ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६५ त्वर्य**

येरवडा स.नं. ४ लोकशाहिर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक हॉलचे उर्वरित अंतिम कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५६,५१,५७०/- पेक्षा २६.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,७५,३७९=९१ पर्यंत टेंडर अटी शर्तीमधील भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११६६ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६६ त्वर्य**

स.नं.११४/११५, बाणेर येथील लेडिज हॉस्टेलची उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार प्रशांत एस.तळेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९३,७२,४६७/- पेक्षा ३२.३४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६७,६४,२४४=२२ चे रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस त्यापोटी त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११६७ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या सावरकर उद्योग भवन येथील स्वच्छतागृहामध्ये दुरुस्ती व सुधारणा कामे करणे - ०१ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार आकाश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६२,७४,५२७=६४ पेक्षा २७.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,६३,४६३=९५ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११६९ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६८ त्वर्य**

प्रभाग क्र. १० ड, बावधन, स.क्र. २२/५ च्या ॲमिनिटी स्पेसमध्ये विरंगुळा केंद्र व महिला योगा केंद्र च्या इमारतीचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७२,८६,४५७/- पेक्षा १८.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९,०२,७५८=८१ रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटीशर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११७० दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३६९ त्वर्य**

प्रभाग क्र. ३२ ड मधील वारजे येथील वारजे हायवे चौक ते शिवणे पर्यंत डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमुर्ती स्टोन मेटल कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,७८५/- पेक्षा ८.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९१,९९,८०२=२० पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११७३ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर चासीजसह टेंडर स्पेसिफिकेशननुसार खरेदी करणे (बी - १ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११७४ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर बांधणीकरीता टेंडर स्पेसिफिकेशननुसार मे. हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून २ नग चासीज खरेदी करणेकामी टेंडर अटी व शर्तीनुसार १ नग चासीज करीता रक्कम रु.१०,६७,३७६/- याप्रमाणे २ नग चासीज करीता रक्कम रु.२१,३४,७५२/- (जीएसटी व सर्व खर्चासह) प्रोफ्रॉर्मा इनव्हायसद्वारे अडव्हान्स् पेमेंट मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांनी सुचित केल्यानुसार चासीज उत्पादक कंपनी अथवा त्यांचे अधिकृत विक्रेते यांचे नावे अदा करुन चासीज मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे नावे खरेदी करणेस.

२) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर बांधणीकरीता टेंडर स्पेसिफिकेशननुसार मे. हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून चासीज खरेदी कामी मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे नावे रक्कम रु.२१,३४,७५२/- इतक्या रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरेंटी घेणेस.

३) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून चासीज टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे ताब्यात घेऊन त्या चासीजवर १ नग चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशननुसार मिनी फायर टेंडर बांधणीकरीता रक्कम रु.३१,८८,६२४/- याप्रमाणे २ नग चासीजवर मिनी फायर टेंडर बांधणीकरीता रक्कम रु.६३,७७,२४८/- (जीएसटी व सर्व खर्चासह) बांधणीकरुन घेणेस.

४) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी मिनी फायर टेंडर मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून चासीज टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे ताब्यात घेऊन त्या चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशननुसार २ नग मिनी फायर टेंडर बांधणीकामी चासीज व बांधणीकरीता एकूण रक्कम रु. ८५,१२,०००/- (जीएसटी व सर्व खर्चासह) पर्यंत खरेदी करणेस.

५) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी टेंडर स्पेसिफिकेशननुसार मे. हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून मिनी फायर टेंडर वाहन चासीजसह खरेदी कामी होणारा खर्च खालील अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावार खर्ची टाकणेस.

सन २०१७-१८
एफ ई १७ ए २७७/एसवाय१-८३
७-यंत्र सामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची यंत्रसामुग्री
३२.अग्निशामक दलासाठी मिनी फायर टेंडरगाड्या घेणे.
मान्य रक्कम रूपये- १,००,००,०००/- पैकी रक्कम रु. ८५,१२,०००/-

६) पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी टेंडर स्पेसिफिकेशननुसार मे. हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचेकडून मिनी फायर टेंडर बांधणीकामी करारनामा करणेस.

**विषय क्र.२३७१ त्वर्य**

कचरा गोळा करण्यासाठी मनपा चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशननुसार कॉम्पॅक्टर बांधणी करणे (बी - २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. काम अविदा एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग कॉम्पॅक्टर बांधणीकरीता रु.१५,००,००७/- नुसार ७ नग कॉम्पॅक्टर बांधणीकरीता रु.१,०५,००,०४९/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी पाच लाख एकोणपंन्नास फक्त) पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह बांधणी करुन घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११७५ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७२ त्वर्य**

स्मार्ट सिटी ऑफिससाठी (सिटीझन इन्क्वायरी सेंटर) बाणेर स.नं. २९/१+२ येथे बांधण्यात आलेली नवीन क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीमधील काही भाग उपलब्ध करुन देणेबाबत मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१०२ दि. १२/२/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११७७ दि. १३/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**विषय क्र.२३७३ त्वर्य**

कोथरुड-बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे (सन २०१७-१८) (भाग-३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेमंत शहा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,८२२=३३ पेक्षा १०.००% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०९,९९,८०४=५६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस बील अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/११७८ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७४ त्वर्य**

पुणे कात्रज स.नं.२३/२ पार्ट व स.नं.२७/१/३/१ पार्ट येथील ॲमिनिटी स्पेसच्या जागेवरील डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम क्रिडा संकुलातील जलतरण तलाव ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात जास्त दर देणारे अ.क्र. १ चे निविदाधारक प्रगती फाऊंडेशन, पत्ता-स.नं.२७/१ कात्रज, पुणे ४११०४६ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम

रूपये४,३७,८००/-ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ४,३७,४००/- पेक्षा रक्कम रूपये ४००/- ने जास्त असल्याने त्यांनी देऊ केलेली वार्षिक र.रुपये ४,३७,८००/- स्विकारुन सदरचा जलतरण तलाव शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर वस्तु आणि सेवाकर भरुन घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तींप्रमाणे मक्ता पध्दतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९, आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/११७९ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७५ त्वर्य**

सन २०१७-१८ साठी पुणे मनपाच्या विविध खात्यांसाठी ऑल इन वन संगणक पुरवणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या १४ निविदांपैकी ठेकेदार मे. प्रियाटेक सोल्युशन यांची निविदा सर्वात कमी रकमेची असल्याने त्यांचेकडून खालील कोष्टकानुसार र. रू. ८७,८४,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये- सत्याऐंशी लक्ष चौ-यांशी हजार फक्त) पर्यंत खरेदी करण्यास व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस तसेच त्याप्रमाणे त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/११८० दि.१३/३/२०१८ चे पत्र.

| अ.क्र. | मालाचे वर्णन (टेंडर स्पेसिफिकेशन प्रमाणे) | मेक | परिमाण | दर (सर्व करांसह) | संख्या | एकूण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ऑल इन वन संगणक | LENOVO | नग | ४३,९२०/- | २०० | ८७,८४,०००/- |
| | | | | | एकूण रक्कम रूपये | ८७,८४,०००/- |

**विषय क्र.२३७६ त्वर्य**

वारजे जलकेंद्र येथील एसएनडीटी, गांधीभवन व चांदणी चौक झोनसाठी एच.टी. व एल.टी. मोटर्स पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.न्यु सोलर इलेक्ट्रीकल्स अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ६७,९८,४५०=६४ पेक्षा २.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६६,६२,४८१=६२ पैकी उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु व मलनि/११८१ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७७ त्वर्य**

कोथरुड स.नं.७९/१६ कुंबरे पार्क येथील नियोजित पीएमपीएमएल बस डेपोची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,९६,७५,५२४/- पेक्षा ५.०४% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,६७,७५,८७७=५९ अधिक टेंडर अटी शर्तीमधील भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११९० दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारती हॉस्पीटल मधील लिफ्टची वार्षिक पध्दतीने ऑपरेटिंग कामे करणे (कालावधी दि.२१/११/२०१७ ते दि.२०/७/२०१८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.बी.इलेक्ट्रिकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,१२,३००/- पेक्षा १६.०१११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,८५,८९७=७४ पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/११९१ दि.१३/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र.२३७९ त्वर्य**

मा.मारुती तुपे, मा.सौ.निलिमा खाडे, मा.सौ.कविता वैरागे, मा.सौ.रंजना टिळेकर, मा.सुनिल कांबळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.८/३/२०१८ चे पत्र.

संदर्भ क्र.-१) विषय क्र. ७६४ ठराव क्र. ७६९ दि.७/९/१७.
२) मुख्य लेखा परिक्षक यांचेकडील जा.क्र. ८५८ दि. १७/१/१८
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २०५९ दि. ३१/१/१८

विषय : मुख्य लेखापरिक्षण विभागात'वरिष्ठ लिपीक' या संवर्गात बदलीने नेमणूकीबाबत.

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडे तृतीय श्रेणीतील वरिष्ठ लिपीक या संवर्गातील बदलीच्या रिकाम्या कायम पदावर नेमणुका करणेसाठी मा. स्थायी समितीने संदर्भांकित ठराव क्र. २०५९ दि. ३१/१/१८ ने श्रीमती सुपे विद्या विजय यांची मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ नेमणुक करणेस मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगे त्यांची सह महापालिका आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी श्रीमती सुपे यांची बदलीने नेमणुक आदेशाची त्वरीत कार्यवाही करून तसेच मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांना पुणे मनपा खात्यातून सोडणेस शिफारस करीत आहोत.

**विषय क्र.२३८० त्वर्य**

मा.सौ.ज्योती गोसावी यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३४ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>१)४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २६३, अ.क्र.१८८, प्रभाग क्र. ३४ ब मधील विविध ठिकाणच्या मुताऱ्या व शौचालयांची रंगरंगोटी करणे, दुरुस्त्या करणे व तदनुषंगिक कामे करणे<br>२) शहरातील चौकांची सुधारणा/विकासकामे करणे.यादी क्र.एसटी १,पान क्र.१९३, अ.क्र.४४, प्रभाग क्र.३४ब, मधील तुकाईनगर चौक सुशोभिकरण करणे. | १० लाख<br><br>१० लाख | ---<br><br>--- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ३४ ब मध्ये सनसिटी परिसरात रस्ते डांबरीकरण करणे<br>२)प्रभाग क्र. ३४ ब मध्ये हिंगणे खुर्द परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | <br>---<br>--- | <br>१० लाख<br>१० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२३८१ त्वर्य**

मा.सौ.हमीदा सुंडके, मा.सौ.परवीन शेख व मा.ॲड्.हाजी गफूर पठाण यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २७ मध्ये सिव्हीक कल्चरल व कम्युनिटी सेंटर बांधणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं.सीई२२अे६८०, पान क्र. १०८, हज हाऊस बांधणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २७ मध्ये सिव्हीक कल्चरल व कम्युनिटी सेंटर बांधणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२३८२ त्वर्य**

मा.मारुती तुपे व मा.सुनिल कांबळे यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

अप्पर डेपो ते व्ही.आय.टी.हॉस्टेल (पासलकर चौक) रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राधालक्ष्मी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२५,९५,०९०/- पेक्षा २१.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,४५,०८३=०६ अधिक ५०% वाढीव रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता देण्यात यावी

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठ.क्र. २३१० दि. ३/१/२०१७ निरस्त करण्यात यावा.

**विषय क्र.२३८३ त्वर्य**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

राजमाता जिजाऊ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणेसाठी र. रू. २.५० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस.जे.६, शहरामध्ये नव्याने प्रसुतीगृह / विविध सोयी सुविधा असलेले दवाखाने उभारणे, पान क्र. २२६,अ.क्र.६२, नविन हॉस्पिटलची उभारणी करने व सावित्रीबाई नर्सिंग कॉलेज एकूण तरतूद र.रू. १० कोटी | २.५० कोटी | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>राजमाता जिजाऊ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे. | --- | २.५० कोटी |

**विषय क्र.२३८४ त्वर्य**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड : सीई१७अ२४२/एसजे६-९२.<br>कामाचे नाव : नवीन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम<br>उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे करणे | --- | १ कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२३८५ त्वर्य**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्र.

विद्युत विभागामार्फत विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड : सीई१७अ२४२/एसजे६-९२.<br>कामाचे नाव : नवीन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>विद्युत विभागामार्फत विविध विकास कामे करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**